16 JUL 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एनईपी'च्या माध्यमातून कौशल्यधारक नागरिक घडविणे आवश्यक : कुलगुरू

## प्राचार्यांची बैठक : शिक्षकांच्या क्षमतावाढीसाठी प्रयत्न गरजेचे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत असताना कौशल्यधारक जागतिक नागरिक तयार करण्यासाठी सर्वांच्या विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी केले. राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित महाविद्यालयांतील प्राचार्यांच्या बैठकीस अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, एनईपीची अंमलबजावणी करणे म्हणजे फक्त ढाचा तयार करणे असे नाही. यामध्ये परिणामाधारित शिक्षण राबविणे आणि त्याद्वारे चॉइस बेसड क्रेडिट सिस्टीम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. नावीण्यपूर्ण शैक्षणिक पद्धतीचा अवलंब करून शिक्षकांच्या क्षमतावाढीसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विभागातील अधिकारी आनंद मापुस्कर म्हणाले, ग्रामपंचायतींच्या ठिकाणी कौशल्य केंद्र असले पाहिजेत, यासाठी ५११ कौशल्य केंद्रे सुरू केली आहेत. १२० महाविद्यालयांपासून ही संख्या सुरू करून हजार महाविद्यालयांपर्यंत हे घेऊन जावयाचे आहे. राज्य आणि केंद्रीय पातळीवरील कौशल्य विकासाच्या विविध योजना महाविद्यालयस्तरावर राबविणे आवश्यक आहे.

यावेळी जिल्हा कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळ, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक अजितसिंह जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. रामचंद्र पवार यांच्यासह कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शैक्षणिक धोरण अंमलबजावणी काळाची गरज

## डॉ. एम. एस. देशमुख : शहाजी महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १५ : 'नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी ही काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.

श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय मराठी विभाग आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघातर्फे 'मराठीचा अभ्यासक्रम आणि श्रेयांक आराखडा' यावर एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र झाले. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील मराठी विषयाचे शिक्षक उपस्थित होते. डॉ. देशमुख, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या उपस्थित चर्चात्र झाले.

डॉ. देशमुख म्हणाले, "महाविद्यालयांना स्तरावर पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोजगाराभिमुख भविष्यासाठी फायद्याचे आहे." तीन सत्रामध्ये चर्चासत्र झाले. प्रथम सत्रात डॉ. प्रकाश कुंभार यांनी 'श्रेयांक आराखडा आणि मराठी विषयाचे स्वरूप' यावर विचार मांडले. द्वितीय सत्रात मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी 'श्रेयांक आराखडा आणि मराठी अभ्यासक्रमाचे स्वरूप' यातून उपलब्ध होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या संधीवर भाष्य केले. प्राचार्य डॉ. शानेदिवाण यांनी महाविद्यालयामध्ये राबविल्या जाणाऱ्या नवीन शैक्षणिक धोरणाविषयी माहिती दिली. डॉ. डी. के. वळवी यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. मतेश हिरेमठ यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या वाटचालीचा आढावा घेतला.

प्रभारी प्राचार्य प्रा. डॉ. निला जोशी, प्रा. डॉ. विश्वास पाटील, प्रा. डॉ. दत्ता पाटील, प्रा. डॉ. भरत जाधव, प्रा. डॉ. अनिल गवळी, प्रा. डॉ. प्रकाश दुकळे उपस्थित होते. प्रा. पंढरीनाथ पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पल्लवी कोडक यांनी आभार मानले.

चर्चासत्रासाठी संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे यांचे मार्गदर्शन लाभले. आय. क्यु. ए. सी. समन्वयक डॉ. राहुल मांडणीकर, सहसमन्वयक डॉ. अनिल बलुगडे, डॉ. एन. एस. जाधव, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. के. एम. देसाई, डॉ. डी. एल. काशीद-पाटील, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. व्ही. जे. देठे, डॉ. राजकिरण बिरजे, प्रबंधक रवींद्र भोसले, अधीक्षक श्री. मनीष भोसले यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2024
पुढारी

# योग्य नियोजनातून कमी खर्चात लघुपट शक्य

- स्वप्नील पाटील यांचे प्रतिपादन
- शिवाजी विद्यापीठात 'मधुबाला' लघुपटाचे स्क्रीनिंग



कोल्हापूर : लघुपटाची निर्मिती प्रक्रिया या विषयावर बोलताना दिग्दर्शक स्वप्निल पाटील.

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

योग्य नियोजन व उपलब्ध साधन सामग्रीचा वापर केल्यास कमी खर्चात लघुपटनिर्मिती शक्य आहे, असे प्रतिपादन दिग्दर्शक स्वप्नील पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागाअंतर्गत बी.ए. फिल्म मेकिंग कोर्सचे उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त चित्रकार, दिग्दर्शक स्वप्नील पाटील दिग्दर्शित 'मधुबाला' शॉर्टफिल्मचे स्क्रिनिंग करण्यात आले. यावेळी लघुपटाची निर्मिती प्रक्रिया या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

लघुपटासाठी खूप जास्त बजेट लागत नाही. अत्यंत कमी खर्चामध्ये लघुपट निर्मिती शक्य आहे. यासाठी उत्तम नियोजन आणि आपल्याकडे असलेल्या संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करायला हवा. शॉर्ट फिल्मची प्रक्रिया नेमकी कशी होती ते उलगडून सांगितले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.

यावेळी मास कम्युनिकेशन आणि बी. ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, विराज कुलकर्णी, मल्हार जोशी, आकाश बोकमुरकर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. शिवाजी जाधव यांनी बी.ए. फिल्म मेकिंग या कोर्सची माहिती दिली. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच बारावीनंतर तीन वर्षांचा पूर्ण वेळ चित्रपटाशी संबंधित अभ्यासक्रम सुरू केला आहे. तीन वर्षांत शास्त्रीय पद्धतीने फिल्म मेकिंगचे शिक्षण दिले जाईल. कोर्ससाठी कोल्हापूर, सातारा, सांगलीसह रत्नागिरी, गोंदिया, छ. संभाजीनगर, धाराशिव येथील विद्यार्थ्यांनी अॅडमिशन घेतले आहे. कोर्सचा अभ्यासक्रम हा फिल्म इंडस्ट्रीतील तज्ज्ञ मंडळींनी तयार केला आहे. शिवाय कमी शुल्कमध्ये विद्यार्थ्यांना नव्या गोष्टी शिकता येणार आहेत.

गौतमी शिकलगार हिने सूत्रसंचालन केले. साजिद पिरजादे याने आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2024
लोकमत

# योग्य नियोजनातून कमी खर्चात लघुपट शक्य : पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लघुपटासाठी खूप जास्त बजेट लागत नाही. अत्यंत कमी खर्चामध्ये लघुपट निर्मिती शक्य आहे. यासाठी उत्तम नियोजन आणि आपल्याकडे असलेल्या संसाधनांचा काळजीपूर्वक वापर करायला हवा, असे मत दिग्दर्शक स्वप्निल पाटील यांनी व्यक्त केले.

मास कम्युनिकेशन विभागाअंतर्गत बी. ए. फिल्म मेकिंग कोर्सचे उद्घाटन करण्यात आले. यानिमित्त चित्रकार, दिग्दर्शक स्वप्निल पाटील दिग्दर्शित 'मधुबाला' शॉर्टफिल्मचे स्क्रिनिंग करण्यात आले. यावेळी लघुपटाची निर्मिती प्रक्रिया या विषयावर त्यांनी संवाद साधला. यावेळी मास कम्युनिकेशन आणि बीए फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, विराज कुलकर्णी, मल्हार जोशी, आकाश बोकमुरकर उपस्थित होते.

प्रारंभी डॉ. शिवाजी जाधव यांनी बीए फिल्म मेकिंग या कोर्सची माहिती दिली. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठाने कुलगुरु प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच बारावीनंतर तीन वर्षाचा पूर्ण वेळ चित्रपटाशी संबंधित अभ्यासक्रम सुरू केला आहे. तीन वर्षात शास्त्रीय पद्धतीने फिल्म मेकिंगचे शिक्षण दिले जाईल. गौतमी शिकलगार हिने सूत्रसंचालन केले. साजिद पिरजादे याने आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
16 JUL 2024
पुढारी

# 'दूरशिक्षण' एमबीएची २१ रोजी फेरपरीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने एमबीए (डिस्टन्स) च्या प्रवेशासाठीची फेरपरीक्षा २१ जुलै रोजी होणार आहे. विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता एमबीए (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या प्रवेश परीक्षेसाठी रिक्त जागांकरिता अर्ज प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ज्या विद्यार्थ्यांनी राज्य शासन व भारत सरकारच्या कोणत्याही सांविधानिक संस्था किंवा एटीएमएतर्फे घेतल्या जाणाऱ्या व्यवस्थापन विषयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी घेण्यात आलेली सीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना एमबीएला थेट प्रवेश दिला जाणार आहे. अशा पात्र विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात येणारी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट लागू असणार नाही. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी https:/// www. unishivaji. ac. in/ distedu/ noticeम board. aspx या संकेतस्थळास भेट द्यावी, विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

16 JUL 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्यधारक नागरिक घडवायला हवेत

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; शिवाजी विद्यापीठात प्राचार्यांची बैठक

■ सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील प्राचार्य, शिक्षकांच्या बैठकीत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले.

कोल्हापूर, ता. १५ : 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करीत असताना कौशल्यधारक जागतिक नागरिक तयार करण्यासाठी सर्वांच्या विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

विद्यापीठांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध विषयांच्या अनुषंगाने राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित केलेल्या महाविद्यालयातील प्राचार्यांच्या बैठकीत त्यांनी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन म्हणाले, ''नावीन्यपूर्ण शैक्षणिक पद्धतींचा अवलंब करून शिक्षकांच्या क्षमता वाढीसाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे.''

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास विभागातील अधिकारी आनंद मापुस्कर, ''राज्य आणि केंद्रीय पातळीवरील कौशल्य विकासाच्या विविध योजना महाविद्यालय स्तरांवर राबविणे आवश्यक आहे.'' जिल्हा कौशल्य विकास मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त संजय माळ, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचार्य विभागाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांनीही मार्गदर्शन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, आजीवन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.